स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्र विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी
पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्रारुप आराखडा
(Synopsis)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन विषय

शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवृत्तीचे आर्थिक विश्लेषण विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

संशोधक

प्रा.बोगुलवार अशोक हणमंलू

सामाजिक संकूल विभाग,

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.निळकंठराव पाटील

अर्थशास्त्र विभाग प्रमख,

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड

ऑगस्ट - २०१६

शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवत्तीचे आर्थिक विश्लेषण
विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

प्रस्तावना :-

मानवी उपभोगास अर्थशास्त्रात अनन्य साधारण महत्व असून, मानवाच्या उत्पत्तीपासून मानवाचा उपभोग संबंध आहे. कारण आदि मानवाने आपल्या पोटाची भूक भागवीण्यासाठी अश्मयुगीन काळात कंदमुळाचा उपभोग केला तर आपल्या पोटाची भूक भागविण्यासाठी इतरही पदार्थाचा घेऊ लागला आणि आपल्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या महत्वपूर्ण जीवन आवश्यक गरजा आहेत हे सुध्दा त्याला त्यावेळी उमजले. त्यातूनच मानवी गरजा तृप्तीक्षम असल्या तरी त्या गरजा परत-परत उद्‌भवत असतात. उदा. भूक लागणे अशा परत-परत उद्‌भवणाऱ्या गरजांची पूर्तता मानव आपल्या उपभोगाच्या माध्यमातून करु लागला तर उपभोगाची पुर्तता करण्यासाठी व्यक्तीस उत्पन्नाची आवश्यकता भासू लागली आणि व्यक्तीकडील उत्पन्नावर अधारित त्याचा उपभोग अवलंबून राहू लागला. त्यातूनच व्यक्ती पुढे आपल्या अधिकाधिक गरजांची पुर्तता करण्यासाठी प्रयत्नशील राहू लागला ज्यातून आर्थिक प्रश्न निर्माण होऊ लागला. ज्यात प्रा.लिओनेल रॉबिन्सच्या मतानुसार - अमर्याद मानवी गरजा आणि मर्यादिज परंतु पर्यायी उपयोगाची साधने यांचा परस्पर मेळ घालण्याच्या व्यक्तीच्या क्रियेतून आर्थिक प्रश्न निर्माण होतो.

थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की, मानवी उपभोग हा घटक आर्थिक क्रियेशी संबंधित असून आर्थिक क्रियांचा अभ्यास अर्थशास्त्राशी निगडीत आहे. म्हणूनच मानवी उपभोग हा संपूर्ण

अर्थशास्त्राभोवती फिरत असतो तर मावनी उपभोगाचा प्रश्न हा आदिमानव काळापर्यंत तसेच भविष्य कालीन सततचा प्रवाह आहे म्हणून मानवी उपभोगाचा अभ्यास अर्थशास्त्रात मोडत असून अर्थशास्त्रात उपभोग म्हणजे व्यक्तीच्या गरजा भागविण्याच्या प्रक्रियेसाठी वस्तूंचा व सेवांचा वापर करणे याला उद्देशून उपभोग संकल्पना वापरली जाते.

उपभोगाच्या संदर्भात विश्लेषण करावयाची असल्यास केन्सने आपल्या उपभोगाच्या मानसशास्त्रीय सिध्दांतात असे म्हणतो की, एकत्रित उपभोग हे एकत्रित विनियोग उत्पन्नाचे कार्य आहे. असे असताना मानवाचे उत्पन्न वाढले की त्यांच्या उपभोगातही वाढ होते. पण उत्पन्न ज्या प्रमाणात वाढते त्या प्रमाणात उपभोगात वाढ होत नसली तरी व्यक्तीच्या उत्पन्नावर आधारित व्यक्तीचा उपभोग अवलंबून असतो.

अशा रितीने उपभोग ह्या घटकांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील सन २०११ ते २०१५ य कालावधीतील शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवृत्तीचे आर्थिक विश्लेषण या विषयाची निवड केली आहे. तर नांदेड हा जिल्हा इतर जिल्ह्याच्या दृष्टीने महत्वाचा असून जिल्ह्यास भोगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असून जिल्ह्यातील विविध शासकीय क्षेत्रात अनेक कर्मचाऱ्यांची नेमणूक प्रशासकीय दृष्ट्या करण्यात आली असली तरी अशा कर्मचाऱ्यांचा आपल्या उत्पन्न पातळीवर आधारित असतो तर हा उपभोग किती प्रमाणात उत्पन्नावर आधारित आहे. एकूण वार्षिक उत्पन्नातील किती प्रमाण उपभोगावर खर्च करुन आपल्या दैनदिन जीवनात किती बदल केला आहे. ह्या इत्यादी दृष्टीने जिल्ह्यातील एकूण तालुक्यातून शासकीय कर्मचाऱ्यांची

निवड नमूना पध्दतीने करुन शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवृत्तीचे आर्थिक विश्लेषण या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

संशोधनाचे महत्व :-

"शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवत्तीचे आर्थिक विश्लेषण विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा'' या संशोधन विषयाचे महत्व म्हणजे नांदेड जिल्ह्यातील एकुण शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रमाण त्यात ग्रामीण आणि शहरी शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रमाण लक्षात येण्यास उपयुक्त आहे. तर जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या एकुण उत्पन्नापैकी, उपभोगावरील खर्च करण्यात येणारे उत्पन्नाचे प्रमाण लक्षात येते. त्याचबरोबर एकुण उत्पन्नापैकी उपभोगावरील होणाऱ्या खर्चाचे प्रमाण लक्षात घेतल्यास बचत प्रवृत्ती लक्षात येते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवृत्तीतून शासकीय कर्मचाऱ्यांचा जीवनाचा दर्जा लक्षात येते. अशाच पध्दतीने शासकीय कर्मचाऱ्यांच्या इतर घटकांचाही अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधनाचे महत्व आहे.

संशोधनाची उदिष्टचे :-

"शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवत्तीचे आर्थिक विश्लेषण विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा'' या संदर्भात अभ्यास करीत असताना खालील उदिष्टचे निर्धारीत करण्यात आली आहे.

१) उपभोग प्रवृत्तीच्या सैध्दातीक स्वरुपाचे अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या उत्पन्न पातळी अभ्यासणे.

३) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांची उपभोग पातळी अभ्यासणे.

४) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांची बचतीची पातळी अभ्यासणे.

५) नांदेड जिल्ह्यातील सन २०११ ते २०१५ या कालावधीतील आर्थिक आढावा घेणे.

६) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोगा वरील खर्चाचा अंदाज लावणे.

संशोधनाची गृहितके :-

"शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवत्तीचे आर्थिक विश्लेषण विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा'' या विषयास अनुसरुन संधोधनात्मक अभ्यास करीत असताना खालील गृहितके किंवा उपकल्पना लक्षात घेतल्या आहेत.

१) नांदेड जिल्ह्यातीलशासकीय कर्मचाऱ्यांची उपभोग प्रवृत्ती हा उत्पन्नावर अवलंबून आहे.

२) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे उपभोग प्रवृत्ती ही कमी आहे.

३) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बचत प्रवृत्ती जास्त आहे.

४) नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचार्यांची उपभोग फलन सापेक्ष परिकल्नपेशी संबंधीत आहे.

संशोधन पध्दत :-

प्रस्तुत संशोधन अभ्यास हा प्राथमिक व व्दितीय माहितीवर आधारीत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोगाचा आर्थिक विश्लेषण करण्यासाठी प्रत्यक्ष उत्तरदात्याकडे जाऊन अनुसूचीच्या साहाय्याने

त्यांच्या उपभोग, उत्पन्न, राहणीमान, बचत, शिक्षण अशा आनेक बाबीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहे तसेच या विषयाचे अभ्यास करीत असताना या विषया संदर्भात ज्या आनेक विचारंवतानी, लेखकांनी व अर्थशास्त्रज्ञानी जे संदर्भ प्रकाशित केलेले आहेत त्या साहित्याचा मोठ्या प्रमाणात आधार घेणार आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्याच्या उपभोगाचे आर्थिक विश्लेषण अभ्यास करीत असताना एकुण १६ तालुक्यातील ३२० कर्मचाऱ्याचे प्रत्येक तालुक्यातून १० शहरीभाग व १० ग्रामीण भागातून कर्मचाऱ्यांची निवड करुन अनुसूचीच्या साहाय्याने एकूण ३२० कुटूंबांचे सर्वेक्षण करणार आहे तसेच अनुसूची हे गृहितके लक्षात घेऊन तयार करण्यात येणार असून संशोधनास पुरक ठरणाऱ्या माहितीची नोंद देखील या दरम्यान घेण्यात येणार आहे.

संशोधनाचे शिर्षक :-

"शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवत्तीचे आर्थिक विश्लेषण विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा'' हे संशोधनाचे शीर्षक निश्चित करण्यात आले आहे.

नमुना निवड :-

संशोधकाने संशोधनासाठी "शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोग प्रवत्तीचे आर्थिक विश्लेषण विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा'' या विषयाचे अध्ययन करण्यासाठी सहेतूक किवा उद्देशपूर्ण नमुना निवड पध्दती नुसार एकूण १६ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातून २० अनुसूची भरुन घेणार असून या मध्ये प्रत्येक तालुक्यातील १० ग्रामीण भागातील तर

१० शहरी भागातील शासकीय कर्मचाऱ्याच्या असे एकुण १६ तालुक्याचे ३२० अनुसूची च्या साहाय्याने भरुन घेणार आहे व याव्दारे आपले विश्लेषण स्पष्ट करणार आहे.

तथ्य संकलण :-

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व व्दितीय स्त्रोताचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतात प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातून सहेतूक पध्दतीने ३२० अनुसूची भरुन घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील २० अनुसूचीच्या साहाय्याने नमुना निवड केली जाणार असून सर्वेक्षण, निरीक्षण व अनुसूची या प्राथमिक स्त्रोताव्दारे तथ्ये संकलीत करणार आहे. तसेच कार्यालयीन कागदपत्रे, पुस्तके, मागील संशोधीत साहीत्य समितीचे अहवाल, वर्तमानपत्रे, मासिक, साप्ताहिक, नियतकालीके, गॅझेट, शासकीय अहवाल, आयोगाचे अहवाल इ.व्दितीय साहीत्याच्या माध्यमातून तथ्य संकलीत केले आहे.

संशोधन क्षेत्र :-

संशोधन क्षेत्राची निवड करीत असताना नांदेड जिल्हा हा मराठवाडा भागातील एक जिल्हा असून मराठवाडा हा विभाग आजून मागास म्हणून ओळखला जातो म्हणून काही भागाचा आजून ही विकास झालेला नाही म्हणून नांदेड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या उपभोगाचे आर्थिक विश्लेषण या संशोधनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या उपभोगावरील होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणार आहे.

संशोधन विषयाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात कर्मचाऱ्याच्या उपभोगाच्या आर्थिक विश्लेषण करीत असताना नांदेड जिल्ह्याचा संदर्भ घेऊन अभ्यास करण्यात येणार असून नांदेड जिल्ह्यातील कर्मच्याऱ्याच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणार आहे. संदर संशोधनाव्दारे निष्कर्ष केवळ नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्याच्या आर्थिक विश्लेषणा संदर्भात आहेत त्यामुळे ते इतर जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्याशी लागू होणार नाही.

प्रकरण आराखडा :-

प्रकरण पहिले

प्रास्ताविक व संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने प्रामुख्याने संशोधन करीत असताना यात विषयाची प्रस्तावणा, अभ्यासकाचे हेतू, महत्व, उदिष्टचे, गृहितकृत्ये, शिर्षक, नमुना निवड, तथ्य संकलन, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा व पुर्वसाहित्याचा अवलोकन इ. घटकाचे विश्लेषण या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण दुसरे

सैध्दातीक विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणात उपभोगाच्या संदर्भात ज्या आनेक विचारवंत, समिती व अर्थशास्त्राज्ञानी जे सिध्दात स्पष्ट करण्यात आले आहेत त्या सर्व सिध्दातांचा सैध्दातीक विश्लेषण या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण तिसरे

नांदेड जिल्हा एक दृष्टीक्षेप व नांदेड जिल्ह्यातील उपभोग प्रवृत्ती

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील भौगोलिक, ऐतिहासिक, लोकसंख्या, साक्षरता, उत्पन्न विषयक घटक आणि विविध शासकीय कर्मच्याऱ्याच्या वर्गवारीचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण चौथे

तथ्य संकलन व त्याचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपभोगाचे आर्थिक विश्लेषण या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या अनुसूचीचे वर्गीकरण करुन तक्त्याचे आलेखाच्या साहाय्याने विश्लेषण या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन करीत असताना ज्या काही निष्कर्ष प्राप्त झाले आहेत त्या निष्कर्षाच्या अनुशंगाने या समस्येसाठी काही शिफारशी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ

१) सुक्ष्म अर्थशास्त्र - रायखेलकर

२) भारतीय अर्थव्यस्था - दंत्ता सुदंरम.

३) स्थुल अर्थशास्त्र - एच.एल.अहुजा.

४) सुक्ष्म अर्थशास्त्र - राम देशमुख

५) भारतीय अर्थव्यस्था - काटे व भोरे.

संशोधक

अशोक हणमंलू बोगुलवार

सामाजिकशास्त्र संकूल विभाग,

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.निळकंठराव पाटील

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड